# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
# जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी :-
sceapune@gmail.com

क्रं.रासनिप्रा/आस्था-२/जाहिरात/नि.का/८१६ /२०१५ दिनांक२०/०१/२०१५

वाचावे:- १) सामान्य् प्रशासन विभाग शा.नि. पीयुवी १०००/प्र.क्र.७३/२०००/३४ दिनांक १ मे २००१
२) सामान्य् प्रशासन विभाग शा.नि.क्रं.जाहिरात २००९/प्र.क्रं.१३७/का-३४ दि.३१/८/२००९

**-:परिपत्रक :-**

**विषय : शासकीय जाहिरात वितरण धोरण सुधारणा २००९ नुसार निवडणूक कार्यक्रम जाहिरात प्रसिध्दीबाबत.**

उपरोक्त संदर्भाधीन विषयान्वये कळविण्यात येते की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अन्वये राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणूका घेणेसाठी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकारणाची स्थापना झालेली आहे.

प्राधिकारण स्तरावरुन राज्यातील कोणत्याही सहकारी संस्थांच्या निवडणूक कार्यक्रमाची जाहिरात प्रसिध्द केली जात नाहीत. त्यामुळे सहकारी संस्थांच्या निवडणूकीच्या संदर्भात संबंधित संस्थेचे निवडणुक निर्णय अधिकारी म्हणून आपण निवडणूक कार्यक्रम संदर्भात जर जाहिरात वर्तमानपत्रातच द्यावयाची आवश्यकता भासल्यास, संदर्भ क्र. 1 व 2 चे शासन निर्णयानूसार वेळोवेळी सुधारीत केलेल्या वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करावयाच्या जाहिराती धोरणाप्रमाणेच कार्यवाही करणे आवश्यक आहे.

तरीही या अनुषंगाने या प्राधिकरणांतर्गत सर्व संबंधित कार्यालय प्रमुख तथा निवडणुक निर्णय अधिकारी यांना कळविणेत यावे की, सहकारी संस्थांच्या निवडणुकीसाठी आवश्यक खर्च जिल्हा / तालुका स्तरावर निवडणुक खर्चासाठी बँकांमध्ये खाती उघडण्यात आलेली आहेत सदर खात्यातून जाहिरातीबाबतचा खर्च करावयाचा असल्याने जर निवडणुक कार्यक्रमांची जाहिरात वर्तमानपत्रातच द्यावयाची आवश्यकता भासल्यास, उपरोक्त् शासन निर्णयाप्रमाणे विहीत प्रक्रियेव्दारे जाहिरात कार्यक्रम प्रसिध्दीस देणे अपेक्षित आहे व याची संपुर्ण जबाबदारी संबंधित संस्थेचे आदेशित निवडणुक अधिकारी यांचेवर आहे. तरी वरील सर्व तरतुदींचे अवलोकन करुन जाहिरात प्रसिध्दीबाबत काटेकोरपणे अमंलबजावणी होईल याची दक्षता घेणेत यावी.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, म.रा.पुणे यांचे आदेशानुसार.**

**( डॉ.अे.बी.जोगदंड )**
**सचिव**
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य पुणे.

प्रत :-

१) विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (प्रशासन / लेखापरीक्षण)
२) सहनिबंधक सहकारी संस्था ~~(सर्व)~~ मुख्यालय, रा. स. लेप, पुणे
३) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
४) जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१ सहकारी संस्था, (सर्व)
५) सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, (सर्व)
६) राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण,म.रा.पुणे कार्यालयातील सर्व कक्ष प्रमुख
७) निवड नस्ती,